# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


**तात्काळ/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/ ११४

दिनांक :- 11 JAN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

पदविका/पदवी व पदव्युत्तर

अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय – जिल्हा परिषद/पंचायत समिती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२०१७ साठी मतदार जनजागृती अभियान राबविण्याबाबत.**

संदर्भ :- १. मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१६/सा.प्र./जि.प.पं.स/निवडणूक/कावि-११ दिनांक ३०/१२/२०१६

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, राज्यातील २६ जिल्हा परिषद, १९७ पंचायत समित्या आणि १८ महानगरपालिकेच्या निवडणुका सन २०१७ मध्ये होणार आहेत. या निवडणुकांसाठी मतदारांनी निर्भयपणे व प्रलोभनास बळी न पडता मोठया प्रमाणात मतदान करण्यासाठी मतदारामध्ये मतदान जनजागृती मोहिन राबवावी.या काळात येणारे सण,उत्सव,राष्ट्रीय दिवस नवीन वर्ष, जागतिक मतदान दिवस, प्रजासत्ताक दिन याचे औचित्य साधुन महत्वाच्या वर्दळीच्या ठिकाणी मतदान करण्याबाबत संदेश व शुभेच्छा फलक लावणे बाबत. मा.राज्य निवडणूक आयोग यांनी सुचना दिलेल्या आहेत.

युवा मतदारांचा सहभाग वाढविण्याच्या द्युष्टीने विद्यार्थ्यांच्या सहभागाने **'मतदार जागृती मोहिम'** अंतर्गत खालील उपक्रम राबविणे बाबत सुचना दिलेल्या आहेत.

या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की, संस्थेत विद्यार्थ्यांच्या सहभागाने मतदार जागृती मोहिम राबविण्यात यावी.

१. महाविद्यालयात प्रवेश देताना विद्यार्थी मार्फत पालकांना मतदान करण्यासाठी आवाहन करणे.
२. जनजागृती अभियान एन.सी.सी., एन.एस.एस.इ. च्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे.
३. महाविद्यालयातील विविध उत्सव/स्पर्धा व कार्यालयांमध्ये विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करणे व नाविन्यपुर्ण उपाययोजना.
४. मतदान जागृती बाबत विद्यापीठ/महाविद्यालयामध्ये विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करणे व नाविन्यपुर्ण उपाययोजना करणे.
५. विद्यार्थ्यांच्या मदतीने गृहनिर्माण सोसायटीना दत्तक घेणे व त्या सोसाटयांना विद्यार्थ्यांनी भेट देऊन निर्भय व मुक्त वातावरणात मतदान करण्यासाठी आव्हान करणे.
६. उत्कृष्ट काम करण्या-या विद्यार्थ्यांना व सोसायटीना बक्षीस देणे बाबत विचार करणे.
७. पद यात्रा आयोजन माहे फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवाडयाच्या दरम्यान नागरिकांच्या वर्दळीच्या व महत्वाच्या ठीकाणी पदयात्रा काढण्याचे नियोजन करण्यात यावे.

८. पथनाटय- प्रत्येक महाविद्यालयाने त्याच्या जवळच्या परिसरात किमान पाच ठिकाणी पथनाटय आयोजन करण्यात यावे.(बसथानके, नामांकित मॉल, रेल्वे स्टेशन इ.)

९. प्रत्येक महाविद्यालयाने त्यांच्या परिसरातील किमान दोन गृहनिर्माण संस्था रहिवाशांकडे किमान तीन वेळा भेट देऊन मतदानाचा हक्क निर्भयपणे व प्रलोभनास बळी न पडता बजावण्याबाबत आव्हान करणे.

१०. महाविद्यालये संस्थे अंतर्गत उपलब्ध असलेले एसएमएस कम्युनिटी रेडीओ व व्हरच्युअल क्लासरुम यांचे मार्फत यंत्रणेचा वापर करून विद्यार्थ्यांने पालकांना मतदान करणे बाबत आव्हाण करणे.

११. महाविद्यालयीन युवा महोत्सव व इतर कार्यक्रमाच्या वेळी (व्याख्याने, परिसंवाद, युवा महोत्सव, स्पर्धा स्नेहसंम्मेलन, वार्षिक पारितोषीक समारंभ इ.)

१२. मतदार जागृती साठी पोस्टर बॅनरद्वारे प्रसिध्दी व पथनाटय इ.स्वरूपाचे उपक्रम राबवावे.

वरील प्रमाणे आपल्या संस्थेमार्फत मतदान जनजागृती बाबतच्या कार्यक्रमाचे आयोजन करून त्या बाबतचा अहवाल दर पंधरा दिवसांनी या कार्यालयास सादर करावा.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी